M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी नवी मुंबई - 400 703.

तातडीचे व महत्वाचे

क्र.मुविमं /माध्य.परीक्षा / 1727
वाशी, नवी मुंबई- ४०० ७०३
दिनांक : ०९/०४/२०२६

प्रति,

मुख्याध्यापक
संबंधित मंडळ मान्यताप्राप्त
माध्यमिक शाळा
ठाणे,रायगड पालघर,
मुंबई पश्चिम, दक्षिण व उत्तर.

विषय - कलागुण सवलत प्रकरणासंदर्भात विनाविलंब कार्यवाही पूर्ण करण्याबाबत...

संदर्भ - १) क्र./रा.म/परीक्षा-०७/१६५/१६/०१/२०२६ चे पत्र.
२) क्र./रा.म/परीक्षा-०७/१०३६/६/०३/२०२६ चे पत्र.

वरील विषयास अनुसरून पुनश्चः आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु / मार्च - २०२६ परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे कला गुण सवलतीचे प्रस्ताव अंतिम दिनांक ०९/०३/२०२६ पर्यंत मुख्याध्यापकांच्या शिफारसीसह **online** प्रणालीद्वारे मंडळ कार्यालयात प्राप्त झालेले आहेत.

सदर प्रस्तावांची छाननी केल्यानंतर अंतिम प्रक्रिया कार्यालयीन स्तरावर चालू असुन प्रकरणाचा निपटारा शीघ्रतेने होणे क्रमप्राप्त आहे. मात्र, सदरबाबत अवलोकन केले असता शाळेच्या डेस्कवर **Draft** मध्ये बरीच प्रकरणे आज दि. ९ /०४/२०२६ पर्यंत विनाकार्यवाही तशीच प्रलंबित असल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदरबाबत अंतिमतः आपणास सूचित करण्यात येते की, कला गुण सवलतीचे अर्ज या वर्षीपासून **online** प्रणालीद्वारे भरले असल्याने त्यासंदर्भातील सर्व आवश्यक ती कार्यवाही मंडळाच्या विहित कालमर्यादेत पुर्ण करणे अनिवार्य आहे. विहित कालमर्यादेत कार्यवाही पुर्ण न झाल्यास त्यावर आधारित पुढील तांत्रिक कामे पुर्ण होण्यास विलंब होऊन निकाल प्रक्रियेवर त्याचा एकंदरीत परिणाम होणार आहे.

सदर बाब गंभीर असून शालेय डेस्कवरील अनुक्रमे Draft/Incomplete/Approved by school Status ला प्रलंबित असलेले कला प्रस्ताव SEND TO DIVISIONAL BOARD करण्यास येणाऱ्या अडचणींचे निरसन करुन घ्यावे तथा संबंधित विद्यार्थ्यांचे विहित विलंबशुल्क विनाविलंब भरणा करून मंडळाशी संपर्क साधावा व कार्यवाही पूर्ण करावी. शालेय **desk** वरील सर्व विद्यार्थ्यांबाबत अंतिम कार्यवाही झाली आहे किंवा नाही याची खातरजमा मुख्याध्यापकांनी स्वतः करावयाची आहे. कोणताही विद्यार्थी सवलतीच्या गुणांपासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तत्पश्चात, विद्यार्थी गुणदानापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील व सदर प्रस्तावासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची प्रामुख्याने नोंद घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे - पवार)
विभागीय सचिव
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई ४००७०३.

प्रत महितीस्तव व कार्यावाहीस्तव -

१) सचिव, राज्यमंडळ, शिवाजीनगर पुणे- ४११००४.
२) शिक्षणाधिकारी (माध्य.)ठाणे/रायगड/पालघर
3) शिक्षण निरीक्षक मुबंई दक्षिण/पश्चिम उत्तर.